**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व सलंग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. ०१ /०१/२०१५ ते ३०/०९/२०१५ या कालावधीची महागाई भत्ता थकबाकी देण्याबाबत.**

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.**
**अर्थप्रशासन विभाग**

वाचा : १) या विभागाचे परिपत्रक क्र.अप्रवि/मभवा/निमवा/२०१५-१६/१३६६, दि.२७/१०/२०१५.
२) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : मभवा-१११५/प्र.क्र.४२/ सेवा-९, दि.१५/०१/ २०१६.
३) शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक : निमवा-२०१५/प्र.क्र.७१/ सेवा-४, दि.१६/०१/२०१६.

**आदेश**

क्र.अप्रवि/मभवा/निमवा/२०१५-१६/2906 दिनांक: १८/०१/२०१६

उपरोक्त **परिपत्रक क्र १.** नुसार २७ ऑक्टोंबर, २०१५ पासुन **मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन / निवृत्ती वेतन/कूटूंब निवृत्ती वेतन** यांच्या एकूण रकमेवर दिनांक १ ऑक्टोंबर, २०१५ पासुन ६ % दराने महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे म्हणजेच सध्याच्या १०७ % महागाई भत्या ऐवजी वरीलप्रमाणे वेतनाच्या/निवृत्ती वेतनाच्या/कूटूंब निवृत्ती वेतनाच्या ११३ % महागाई भत्ता वाढ मंजूर केली आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न अनुदानित संस्थातील कर्मचा-यांना व निवृत्ती वेतन धारकांना दिनांक १ ऑक्टोंबर, २०१५ पासुन उपरोक्त महागाई भत्याची वाढ लागु करण्यात आलेली आहे. **आता उपरोक्त शासन निर्णयान्वये माहे जानेवारी ,२०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीची महागाई भत्ता वाढीची थकबाकी रक्कम रोखीने देण्यात यावी.**

सदरहू महागाई भत्याची थकबाकी **माहे जानेवारी-२०१६ देय फेब्रुवारी-२०१६ चे नियमित वेतन, निवृत्ती वेतन देयकात रोखीने अदा करावी. किंवा त्यापुढील नियमित मासिक वेतन देयकात** समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पूरवणी देयके पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या **थकबाकी** अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०१५-१६ चे मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

भाकृअप योजनातंर्गत २०१५-१६ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिका-यांनी प्रस्तुत महागाई भता थकबाकी विचारात घेवून त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी. व्दितीय सहामाही करीता अनुदानाची मागणी यापुर्वी केलेली असल्यास महागाई भत्याच्या थकबाकी तरतुदीसाठी स्वतंत्र वाढीव मागणीचा प्रस्ताव संबंधित कार्यान्वयन अधिका-यांनी भाकृअपस त्वरीत सादर करावा.

**नियंत्रक**
**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

प्रति:१) नियंत्रण अधिकारी(सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख(सर्व).

2)प्राचार्य

3)अधिदान व लेखा अधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला/नागपुर.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना **१ जानेवारी ,२०१५ ते ३० सप्टेंबर, २०१५** या कालावधीची महागाई भत्ता थकबाकी रक्कम रोखीने माहे **जानेवारी-२०१६ देय फेब्रुवारी-२०१६** चे नियमित मासिक निवृत्ती वेतन देयकात प्रदान करणेत यावी. महागाई भत्ता अदा करण्यासाठी निवृत्ती वेतन अथवा वेतनाचे स्वतंत्र पुरवणी देयके आपण पारित करु नये.

**नियंत्रक**